Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 3, Sept 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# *''विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या व शैक्षणिक समुपदेशन''*

***गायकवाड उमाकांत सुभाष***

मानसशास्त्र विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, चिंचोली (लि)
ता.कन्नड जि.औरंगाबाद– 431147

***सारांश :***

21 व्या शतकात ज्ञानाचा विस्फोट झाला आहे. आजचे युग स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. 2020 मध्ये भारत देश हा एक महासत्ताक देश बनेल असे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे स्वप्न आहे ते वास्तवात उतरविण्यासाठी युवकाला, विद्यार्थ्याला समुपदेशन, मार्गदर्शनाची गरज आहे. आज विद्यार्थ्यांसमोर शैक्षणिक समस्या भस्मासुरासारख्या आ करुन उभ्या आहेत. शाळा, महाविद्यालयामध्ये विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून अध्यापन केले जाते. आजच्या विद्ययार्थ्यांतुनच एक चांगला नेता, शास्त्रज्ञ, डॉक्टर, आदर्श नागरीक, कुटूंब व्यवस्थेचा घटक अशा अनेक क्षेत्रामध्ये विद्यार्थी चकमेल परंतू या विद्यार्थ्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

ग्रामीण भागामध्ये असं म्हणतात की शिकून कुठं कलेक्टर होणार आहे, काय शाळेत जातो, शेतातील कामे कोण करणार अशा अनेक समस्या विद्यार्थ्यांसमोर उभ्या राहतात. शासनाने विद्यार्थ्यांच्या समस्याकडे डोळे झाक केली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी अजुनही शिक्षणाबाबत अनभिज्ञ आहे, शिक्षणापासून दूर आहे. त्यांना समुपदेश मार्गदर्शनाची गरज आहे. आजच्या विद्यार्थ्यांवर, युवकांवर देशाचे भवितव्य अवलंबून आहे. विद्यार्थी देशाची धन, दौलत आहे. कोणत्याही राष्ट्राची समाजाची प्रगती ही त्या देशातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीवरुन, विकासावरुन लक्षात येते म्हणूनच भारताला युवकांचा देश म्हटले जाते. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सोडवायच्या असेल तर शैक्षणिक समुपदेशनाशिवाय पर्याय नाही. पालकांचे शिक्षणाबाबतचे अज्ञान दुर करणे व त्यांनाही मार्गदर्शन करणे काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या कोणत्या, त्याचे परिणाम काय?व त्यावरील उपाय योजना याबाबतचे समुपदेशन याबाबत शिक्षकांनी, पालकांनी जागरुक असायला पाहिजे, प्रस्तुत लेखात याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

### *प्रस्तावना :*

सर्व प्रकारच्या शालेय समायोजनाच्या समस्या सोडविण्यासाठी मदत करणे व त्याला एक जबाबदार व्यक्ती बनविणे हे शैक्षणिक समुपदेशनाचे ध्यये आहे. शैक्षणिक समुपदेशनाशी संबंधीत एक शाखा म्हणजेच शालेय समुपदेशन होय. शिक्षण म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिन विकास आणि तिच्या ठिकाणी विविध कौशल्ये व क्षमता वृध्दिंगत होणे. प्राचीन काळापासून मानवाने शिक्षणाचे महत्व ओळखले आहे. आधुनिक काळात समाजजीवन गतिमान बनले असून शिक्षणासाठी प्रचंड स्पर्धेस तोंड द्यावे लागत आहे. युवकांना भविष्यकालीन आव्हानांना तोंड देण्यासाठी सज्ज होण्याकरीता शिक्षण हाच जीवनाचा अत्यावश्यक भाग आहे. 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे' असे म्हणतात. याच शैक्षणिक क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्यासाठी शैक्षणिक समुपदेशनाची आवश्यकता आहे. शाळा–कॉलेजमधील मुलांच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण होतात. उदा. अध्ययनात अभिरुची नसणे शाळेसंबंधी नकारात्मक अभिवृत्ती इ.शालेय वातावरणाशी मुले समायोजित होत नाहीत. त्यांच्यामध्ये चिंता, ताण–तणाव आढळतात. शालेय समायोजनाच्या समस्या सोडविण्यासाठी गरजू विद्यार्थ्यांस मदत व मार्गदर्शन करणे म्हणजेच शैक्षणिक समुपदेशन होय. शाळा, कॉलेज, विद्यापीठ इ. शैक्षणिक परिसराविषयक समस्या निर्माण झाल्यानंतर त्यातून गंभीर व समाजविरोधी वर्तन घडू नये किंवा आंतरिक संघर्षे वाढीस लागू नये यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणारी मानसशास्त्राची एक शाखा म्हणून शैक्षणिक समुपदेशन शाखा उदयास आली. शैक्षणिक समुपदेशन म्हणजे एक तत्वज्ञान, एक कार्य भूमिका आणि कृती होय.

(Educational counseling is a philosophy, a function, a role and an action)

### *1) प्राथमिक शाळेतील मुलांच्या समस्या व उपाय :*

घरातील प्रेमळ व जिव्हाळयाचे वातावरण सोडून मुलांना शाळेत दाखल केले जाते. घरचे वातावरण व प्राथमिक शाळेतील वातावरण

**Please cite this Article as :** *गायकवाड उमाकांत सुभाष, ''विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या व शैक्षणिक समुपदेशन''* **: Golden Research Thoughts (Sept ; 2012)**

यातील तफावत त्यांना जाणवते. त्यामुळे सुरुवातीला जेव्हा पालक मुलास शाळेत सोडतात तेंव्हा मुले खुप रडतात. पण काही दिवसानंतर मुले शालेय वातावरणात रमतात शाळेत आनंदाने वावरतात. परंतू सुरुवातीचा शाळेत जाण्याचा हा कालखंड म्हणजे शालेय समायोजनाच्या समस्याविषयी अज्ञानाचा कालखंड होय. त्यांना समायोजनाच्या समस्याविषयी काहीच माहीत नसते. सर्वसाधारणपणे बालवाडी, पूर्व प्राथमिक वर्ग किंवा प्राथमिक शाळेत प्रवेश घेतल्यानंतर सुरुवातीस ही मुले अत्यंत उत्साहित असतात. परंतू त्यांचा हा उत्साह फार काळ टिकत नाही. प्राथमिक शाळेत जायला सुरुवात झाल्यानंतर मुलांचा बराच वेळ घराबाहेर शाळेत जातो. अशा वेळी घरच्या प्रेमळ वातावरणांची त्यांना शाळेत उणीव जाणवते. जर लहान मुलांचे शाळेतील अनुभव दुःखकारक असतील तर प्राथमिक शाळेतील या उमलत्या कळयांच्या दृष्टीने ही दुर्दैवाची बाब ठरु शकते म्हणूनच प्राथमिक शाळेतील मुलांच्यासमुपदेशनात अशा विद्यार्थ्यांच्या अध्ययन समस्या सोडविण्यास मदत करणे आणि शालेय वातावरणा संबंधीचे अनुभव आनंददायी कसे होतील यासाठी मदत करणे या गोष्टींचा समावेश होतो. शाळेत जाणे हा आनंददायक अनुभव किंवा रमून जाण्याचा अनुभव कसा होईल यासाठी समुपदेशक प्रयत्न करतात. प्राथमिक शाळेतील समुपदेशनाचे प्रमुख ध्येय म्हणजे भावनिक बिघाड किंवा भावनिक अस्वास्थ यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे होय.

प्राथमिक शाळेत प्रवेश घेतल्यानंतर मुलांच्या बाबतीत समायोजनाच्या समस्या निर्माण होतात. कारण आपल्या घरात असतांना ही मुले सर्वांना आवडणारी व सर्व कुटूंबाच्या आनंदाच्या केंद्रस्थानी असतात. मात्र प्राथमिक शाळेत प्रवेश घेतल्यानंतर शालेय वातावरण त्यांना नविन असते. त्यांना फारसे कोणीही ओळखत नसते. वर्गात ही मुले एकाकी, दुःखी व उदासपणे बसून राहिलेली आढळतात. घरामध्ये आढळुन येणारे भावनिकदृष्टया उबदार व प्रेमळ स्वरुपाचे वातावरण शाळेत आढळुन येत नाही. लहान मुलांच्या समायोजनाच्या दृष्टीने हा फारच मोठा तोटा ठरतो. मौलिक स्वरुपाच्या सुखद भावनिक अनुभवास त्यांना मुकावे लागते. अशी मुले शाळेविषयी निराश व नाराज बनतात. त्यांच्या बाबतीत समायोजनाच्या समस्या निर्माण होतात. याशिवाय प्राथमिक शाळेत लहान मुलांच्या क्षमता विचारात न घेता जर अभ्यासक्रम ठरविले असतील किंवा त्यांच्यावर लादलेले असतील तर अशा चुकीच्या बोजड अध्ययन साहित्यामुळे काही समस्या निर्माण होतात. अध्ययन साहित्य आवाक्याबाहेरचे असेल तर मुलांना समजत नाही त्यामुळे मुलांची शाळेविषयीची आवड कमी होऊ लागते.

वर्गातील इतर मुलांकडून दुबळया मुलांचा छळ केला जाणे, इतरांनी चिडविल्यामुळे नाराज व दुर्मुखलेली मुले शालेय वातावरणात रमत नाहीत. अशा भावनिक अनुभवांचा मोठेपणी व्यक्तीच्या जीवनावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. म्हणून अशा प्रकारचे भावनिक प्रश्न शालेय समुपदेशकाकडून वेळीच सोडविले गेले पाहिजेत. नाहीतर मुलांच्या विकासावर अशा भावनिक प्रश्नांचा दूरगामी परिणाम होऊन त्यांचा निकोप विकास होऊ शकत नाही. म्हणूनच प्राथमिक शाळेतील मुलांच्या समायोजनाविषयीच्या भावनिक प्रश्नांची शालेय समुपदेशकाने हळूवारपणे दखल घेऊन ते वेळच्या वेळी कसे सोडवता येतील याबाबत समुपदेशन केले पाहिजे.

### *2) माध्यमिक शाळेतील मुलांच्या समस्या व उपाय :*

माध्यमिक शाळेतील मुलांच्या समस्या ह्या प्राथमिक शाळेतील मुलांच्या समस्यापेक्षा वेगळया असतात. किशोरवयीन मुलांना वाढत्या वयामुळे अनेक प्रश्न भेडसावतात. वाढत्या वयाशी निगडित समस्यांमुळे त्यांच्यात भावनिक तणाव वाढीस लागतो. अशा परिस्थितीत मुलांना योग्य ती मदत केली नाही तर भावनिक तणावाची स्थिती त्यांच्यामध्ये दीर्घकाळ राहते. त्यामुळे या वयोगटातील मुलांच्या बाबतीत गंभीर स्वरुपाचे भावनिक प्रश्न निर्माण होतात. किशोरावस्थेत मुला—मुलींचा सर्वांगीण विकास अत्यंत झपाट्याने होत असतो. या मुलांच्या स्वतःच्या व्यक्तिगत कल्पना, अभिरुची व भावना असतात आणि त्या भावना अभिरुची वगैरे व्यक्त करुन त्यांना मान्यता व प्रोत्साहन मिळवायचे असते. अशा अवस्थेत समुपदेशकाचे कार्य महत्वाचे असते. समुपदेशकाने माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा अत्यंत जिव्हाळयाने सहानुभूतीपुर्वक विचार करावयास पाहिजे, मैत्रीच्या नात्याने व समजुतदारपणे त्यांना मदत करुन त्यांचा विश्वास व आत्मविश्वास संपादन केला पाहिजे. आवश्यक त्या अभिरुची, अभिवृत्ती आणि उद्दिष्टे त्यांच्यात निर्माण करण्याचा समुपदेशकाने प्रयत्न केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या समस्याचे मर्म समजुन घेऊन ती समस्या स्वतःनेच सोडविली पाहिजे. या संदर्भात समुपदेशकाने मदत करावी. मात्र या अवस्थेत त्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. शालेय किंवा अभ्यासातील संपादनास आधुनिक समाजात जास्त महत्व दिले जाते पण त्यासोबत व्यावसायिक मार्गदर्शनाची अत्यंत गरज असते. विद्यार्थ्यांच्या क्षमता व अभिरुचींची त्याच्या अभ्यासक्रमातील उद्दिष्टांशी सांगड घालुन त्यांच्यात उद्भवणारे तीव्र वैफल्य कमी करण्यासाठी समुपदेशक मदत करु शकतो.

विद्यार्थ्याला त्याच्या क्षमता, अभिरुची, महत्वकांक्षा किंवा ध्येये यांना अनुसरुन योग्य तो अभ्यासक्रम निवडण्यास मदत करणे. सर्वोत्कृष्ट शालेय यश संपादन करण्यासाठी परिणामकारक अभ्यासाच्या सवयी लावण्यासाठी मदत करणे, सुप्त गुणधर्म व क्षमतांचा विकास करणे. व्यवसाय निवडीसाठी मार्गदर्शन करणे. आंतर—वैयक्तिक संबंध निर्माण करुन शालेय जीवन अधिकाधिक आनंदमय करण्यासाठी समुपदेशकाने मदत करावी. प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक विश्वाशी किंवा शालेय क्षेत्राशी समायोजन करण्यासाठी समुपदेशकाने मदत केलीच पाहिजे. अपयशी व यशस्वी ठरलेले विद्यार्थी या दोघांनाही समुपदेशनाची गरज असते. माध्यमिक शाळेतील समुपदेशन करीत असता विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन करण्याचे कार्यही समुपदेशकास करावे लागते. योग्य प्रकारचा व्यवसाय निवडण्यासाठी व त्यात प्रगती करण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करुन घेण्यासाठी समुपदेशक मदत करीत असतो. यावरुन सर्वप्रकारच्या शैक्षणिक समुपदेशनात व्यावसायिक समुपदेशन सुध्दा अभिप्रेत असते.

### *3) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या समस्या व उपाय :*

महाविद्यालयीन समुपदेशन म्हणजे प्राथमिक व माध्यमिक शाळांतून दिलेल्या विविध प्रकारच्या समुपदेशन सेवेचे विस्तारित स्वरुप होय. व्यावहारिक अर्थाने महाविद्यालयीन विद्यार्थी म्हणजे एक प्रौढ व्यक्ती असते. महाविद्यालयातील समुपदेशनात महाविद्यालयीन विद्यार्थ्याने प्रौढत्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःच स्वतःचा मार्गदर्शक व्हावे यावर भर दिला जातो. विद्यार्थ्यांना सर्जनशील व विधायक व्यक्ती बनविणे, तसेच सामाजिक व शैक्षणिक कमतरता किंवा अडथळयावर मात करुन स्वतःचा विकास करता यावा यासाठी समुपदेशकाकडून मदत केली जाते. सल्लार्थी व्यक्तींना शैक्षणिक, व्यक्तिगत व व्यावसायिक समयोजनासाठी मदत करणे असे महाविद्यालयीन समुपदेशनाचे व्यापक स्वरुप आहे. समुपदेशन प्रक्रिया म्हणजे व्यक्तिंना कार्यक्षम, सुसमायोजित व सुखी बनण्यासाठी मदत/मार्गदर्शन करण्याची प्रक्रिया होय. महाविद्यालयीन समुपदेशन सेवांमध्ये प्रामुख्याने विविध प्रकारची माहिती पुरविणे, स्वतःस व इतरांस जाणून घेण्यासाठी मदत करणे, तसेच व्यक्तीस स्वतंत्रपणे कृती करण्यासाठी व स्वतःच्या निवडीस, कृतीस स्वतःच जबाबदार असल्याची जाणीव करुन देण्यासाठी मदत करणे इत्यादींचा समावेश होतो.

महाविद्यालयीन समुपदेशनात विद्यार्थ्यांना काही विशेष क्षेत्राशी संबंधीत समुपदेशन करुन मदत केली जाते. म्हणजेच त्यांना दिली जाणारी सेवा विविध क्षेत्राशी संबंधीत असते. उदा. नोकरी किंवा व्यवसायासंबंधी समुपदेशन, शैक्षणिक, आरोग्यविषयक, आर्थिक व्यक्तिगत समायोजन इ. अशा प्रकारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समुपदेशनाद्वारे विविध क्षेत्रांतील समायोजनासंबंधी माहिती दिली जाते. तसेच स्वतःच स्वतःला आणि इतरांना समजुन घेउन मुक्तपणे योग्य कार्य करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत केली जाते. त्यांनी स्वतःच्या निवडी स्वतंत्रपणे व जबाबदारीने कराव्यात याकरिता त्यांना मदत केली जाते.

शैक्षणिक समुपदेशनामध्ये अभ्यासक्रमाची निवड कशी करावी, कार्यक्षम अभ्यासपध्दतींची माहिती व शैक्षणिक उद्‌दिष्टांची पूर्ती कशी करावी यासंबंधीची माहिती व मदत केली जाते. तसेच व्यावसायिक समुपदेशनाच्या बाबतीत रोजगारपूर्व कार्य, नोकरी–व्यवसायाची निवड आणि कार्य नेमणूक सेवा या स्वरुपाची मदत केली जाते. अशा प्रकारे महाविद्यालयातील शैक्षणिक समुपदेशन बहुआयामी व व्यापक स्वरुपाचे असते. केवळ अभ्यासक्रमाची निवड किंवा शैक्षणिक संपादन एवढ्यापुरते ते मर्यादित नसते. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा परिपूर्ण विकास साधण्यासाठी त्याला मदत करणे, व्यक्तिगत व सामाजिक समायोजन साधणे, जबाबदार नागरिक बनण्यासाठी व जीवनातील सर्व प्रकारची आव्हाने स्वतःच्या क्षमतानुसार पेलण्याच्या त्याच्या प्रयत्नास चालना देण्यासाठी समुपदेशकाने मदत करावी अशी अपेक्षा असते.

***समुपदेशकाचे कार्ये :***

भावनिक बिघाड झालेल्या मुलांना आपल्या समस्यांची सुखद व समाधानकारकपणे उत्तरे शोधण्यासाठी समुपदेशक मदत करतो. शालेय समस्या व अडचणी सोडविण्यासाठी समुपदेशक मदत करतो, समुपदेशक प्रतिबंधात्मक व सुधारात्मक उपाययोजना करीत असतो, पालकांना आपल्या मुलांना चांगल्याप्रकारे समजुन घेता यावे याकरिता समुपदेशक पालकांना मदत करतात, समुपदेशन प्रक्रियेसाठी समुपदेशक योग्य त्या प्रकारच्या मानसशास्त्रीय चाचण्या वापरतात, अभ्यासक्रमाचे किंवा नोकरीविषयीचे योग्य निर्णय घेण्यासाठी त्यांना मदत करण्यासाठी खर्च करतात. इ. कार्य प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये समुपदेशकांना कार्य करावे लागते.

***निष्कर्ष :***

भारताचे आधारस्तंभ आपण हा शब्द नेहमीच नविन पिढीसाठी वापरत असतो. हया पिढींच्या विश्वासावरच डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलामांनी एक स्वप्न पाहिले आणि प्रत्येक भारतीयांच्या डोळ्यात रुजवल म्हणजे प्रत्येक भारतीय ते स्वप्न पाहू लागला. परंतू चिंतनीय बाब म्हणजे विद्यार्थ्यांच्या समस्या सोडून शैक्षणिक समुपदेशन केले नाही तर त्यांचे स्वप्न हे स्वप्नच राहू नये याचाही आपणास विचार करावयास हवा. भारत महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहण्यापेक्षा ते प्रत्यक्षात उतरवण्याकरीता प्रत्येक तळागाळातील विद्यार्थी हा शिक्षीत होणे गरजेचे आहे. निरक्षरता भारतातून मुळापासून नष्ट व्हावी, आजही खेड्यांमध्ये अनेक मुलं अशिक्षित, शिक्षणापासून दूर राहिलेले दिसतात.

प्रत्येक तळागाळातला, प्रत्येक धर्मातला विद्यार्थी हा शिक्षीत असेल तरच भारत हा विकासाच्या वाटेवर आपले यश प्राप्त करु शकतो. आणि त्यासाठी प्रत्येक शहरात, गावात शैक्षणिक सोयी सुविधा असणे हा प्रत्येक मुला–मुलींचा हक्क आहे, त्यासाठी सर्व राजकीय आणि शिक्षण, व्यावसायिक क्षेत्रातील प्रत्येकाने यासाठी प्रयत्न करायला हवे. शिक्षणाविषयी आजही भारतामध्ये बरेच गैरसमज आहेत, हे गैरसमज दुर करण्यासाठी आज शैक्षणिक समुपदेशनाची गरज आहे. उदा. पालक बोलतांना म्हणतात मुलींना शिकवले तर आपल्या काय फायद्‌याचे, मुलगी ही दुसऱ्याचे घरचे धन किंवा मुलांना शिकवुन कोठे नोकरी लागणार आहे असे शब्द ग्रामीण भागात वापरले जातात. विद्यार्थ्यांना योग्य वेळेत मार्गदर्शन मिळाले नाही तर तो भरकटू शकतो यासाठी जास्तीत–जास्त शैक्षणिक समुपदेशनाची गरज आहे.

आज अनेक नोकऱ्या उपलब्ध आहे परंतू त्या नोकऱ्या मिळवण्याची क्षमता, पात्रता अनेक विद्यार्थ्यांमध्ये नाही अनेक शैक्षणिक साधने ग्रामीण भागापर्यंत पोहचले नाहीत यामुळे अनेक विद्यार्थी शिक्षणापासून दुर राहतात. शिक्षणाचे महत्व शिक्षणाचे फायदे, नोकऱ्याबद्‌दल माहिती, विद्यार्थी व पालकांनी ठेवायला पाहिजे. आपल्याला डॉक्टर, शास्त्रज्ञ, इंजिनीयर, कवी, लेखक हवा, चोर व आतंकवादी नको हे विदारक चित्र शिक्षक, प्राध्यापक व शासनाने बदलविले पाहिजे, तेंव्हाच आपण खऱ्या अर्थाने भारत देश साक्षर झाला असं म्हणता येईल. विद्यार्थ्यांच कौशल्यपूर्ण व अष्टपैलू व्यक्तिमत्व घडवल गेलं पाहिजे.

असं झाड जे पुढे मोठं होणार असतं त्याच्या फाद्यांच प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना छाटल्या जातात. घरातील वातावरण कस असावं याची जाणीव पालकांना पाहिजे एक आदर्श विद्यार्थी आपल्याला पाहिजे असेल तर विद्यार्थ्यांला शाळा, महाविद्यालय पातळीवर समुपदेशन, मार्गदर्शन केले तर एक चांगला आदर्श, कौशल्यपूर्ण, अष्टपैलू, विद्यार्थी आपल्यासमोर येईल. शिक्षणाचा उपयोग जीवन जगताना विद्यार्थी करेल तेंव्हाच समुपदेशनाचा उपयोग झाला असं म्हणता येईल.

***संदर्भ :–***


Bengalee, m. (1994), Gudiance & Counselling, seth publishers, Bombay.
Crow and crow (1968), Introduction to Guidance, Earasia publishing Co. New Delhi.
Gelso, C.J. Fertz, B.R. (1995), Counselling psychology, prism Books pvt. Ltd. Bangalore.
Kochar, S.K. (1993), Guidence and Counselling in colleges and universities, sterling pub. Pvt. Ltd. New Delhi.
Lewis E. Patterson (2000), The counselling process, Books/cole.
Madhukar, K. (2000), Guidance and counselling, Author's press New Delhi.
कामत, साधना, (2001), मानसशास्त्रीय मार्गदर्शन, प्यॉप्युलर प्रकाशन.
जगताप, ह.ना.(1995), शैक्षणिक मानसशास्त्र, अनमोल प्रकाशन, पुणे
पवार, बी.एस. आणि चौधरी, जी.बी. (2004), समुपदेशन मानसशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स पुणे.
बांगर, टी.एम.(1996),भारतातील शैक्षणिक व व्यवसायिक मार्गदर्शन, स्वप्नील प्रकाशन, अहमदनगर.
बापट, विद्या वि. (1995), सुजाण पालकत्व, नितीन प्रकाशन, पुणे.
शिंदे व्ही.आर.(1997), अभ्यास कौशल्ये एक पाउल पुढे, ज्ञानेश प्रकाशन, पुणे.
शिंदे, वाय.के. (1997), व्यक्तिमत्व संजीवनी, एज्युकेशनल रिसर्च, ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट इन्स्टिटयुट,सांगली.
सरवदे, शशी, (2008), शैक्षणिक मार्गदर्शन, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
हिरवे, तडसरे, (2008), समुपदेशन मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर